# संघटनात्मक उदासीनता खो-खोच्या प्रगतीला मारक

मिलिंद ढमढेरे, पुणे



आठवड्याची **मुलाखत**

**श्रीरंग इनामदार,**
माजी खो-खोपटू

**खो-खो** खेळाबाबत अनेक देशांमधील चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे, मात्र हा खेळ जगातील कानाकोपऱ्यात पोहोचण्यासाठी आवश्यक असणारा उत्साह संघटनात्मक स्तरावर दिसून येत नाही, त्यामुळेच या खेळास कबड्डीइतके वलय प्राप्त झालेले नाही, असे अर्जुन पुरस्कार विजेते ज्येष्ठ खो-खोपटू श्रीरंग इनामदार यांनी सांगितले.

इनामदार हे पुण्यातील नवमहाराष्ट्र संघाचे ज्येष्ठ खेळाडू, प्रशिक्षक व संघटक आहेत. गेली अनेक वर्षे त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवमहाराष्ट्र संघातर्फे अखिल भारतीय स्तरावर रोख पारितोषिकांची स्पर्धा आयोजित केली जात आहे. त्यांना शिवछत्रपती व अर्जुन हे दोन्ही पुरस्कार मिळाले आहेत. त्यांचा मुलगा शंतनू यालाही शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला आहे. खो-खो खेळाविषयी त्यांनी ‘लोकसत्ता’ प्रतिनिधीबरोबर मनमोकळेपणाने गप्पागोष्टी केल्या.

■ **कबड्डीप्रमाणे खो-खो खेळाची प्रगती होऊ शकलेली नाही, त्याचे काय कारण आहे?**

- परदेशात हा खेळ अधिकाधिक जाण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर संघटनात्मक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. केवळ काही देशांमध्ये प्रदर्शनीय सामने आयोजित केले म्हणजे प्रसार होत नाही. तेथे स्थानिक स्तरावर क्लब तयार करण्यासाठी पाठपुरावा करण्याची गरज आहे. तेथे आपल्या देशातील प्रशिक्षक व तज्ज्ञांची नियुक्ती केली पाहिजे. आम्ही पाठपुरावा करून आगामी आफ्रो-आशियाई क्रीडा स्पर्धेत या खेळाचा स्पर्धात्मक क्रीडा प्रकार म्हणून समावेश करण्यात यश मिळविले आहे. खरे तर यापूर्वीच हा प्रयत्न होण्याची गरज होती. भारतात युवा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा तसेच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी स्पर्धात्मक राहो, पण प्रदर्शनीय खेळ म्हणूनही समावेश नव्हता. या दोन्ही स्पर्धांचे सर्वेसर्वा असलेले सुरेश कलमाडी यांच्या मर्जीतील व्यक्ती खो-खोच्या राष्ट्रीय संघटनेचे नेतृत्व करीत होती, तरीही या दोन्ही स्पर्धांच्या वेळी खो-खोची उपेक्षाच झाली.

■ **खो-खो खेळासाठी प्रीमियर लीग यशस्वी होईल काय?**

- कोणत्याही खेळाची प्रीमियर लीग या प्रामुख्याने खेळाडूंना चांगला आर्थिक फायदा व्हावा व त्याद्वारे खेळाचा खेडोपाडी प्रसार व्हावा यासाठी आयोजित केली जाते. केवळ विजेते किंवा महत्त्वाचे खेळाडू नव्हे, आम्ही आमच्या प्रत्येक अखिल भारतीय स्पर्धेत सर्व सहभागी संघातील प्रत्येक खेळाडूला भरघोस आर्थिक कमाई यास प्राधान्य दिले आहे. एवढेच नव्हे, तर खेळाडूंइतकीच कमाई त्यांचे प्रशिक्षक व संघाचे व्यवस्थापक यांनाही मिळेल याची काळजी आम्ही घेत असतो.

■ **कृत्रिम मैदानाचा या खेळाच्या वाढीसाठी किती फायदा होईल?**

- कुस्ती किंवा कबड्डी यासाठी ज्या मॅट्स वापरल्या जातात, त्या मॅटवरील खो-खोचा अनुभव खेळाडूंसाठी फारसा चांगला नाही. मॅटवरील प्रत्येक स्पर्धेच्या वेळी किमान सात ते आठ खेळाडूंना मोठ्या दुखापतीस सामोरे जावे लागले आहे. काही खेळाडूंना करिअरवर पाणी सोडावे लागले आहे. आम्ही आमच्या क्लबसाठी परदेशातून अव्वल दर्जाचे अॅस्ट्रो टर्फच्या मैदानासाठी चौकशी करीत होतो. मात्र गेल्या तीन-चार वर्षांमध्ये या मैदानांची किंमत चौपटीने वाढली आहे. त्यामुळे एखाद्या खासगी क्लबला असे मैदान घेणे ही अवघड गोष्ट आहे.

■ **खो-खो स्पर्धा आणि पावसाचा व्यत्यय असे समीकरण अनेक वेळा दिसून येते, त्याविषयी काय प्रयत्न केले आहेत?**

- आम्ही आगामी स्पर्धांसाठी २८ फूट उंचीचे भव्य मांडव उभारून दोन्ही मैदाने व प्रेक्षकांची गॅलरी संपूर्णपणे आच्छादित केली आहे. त्यामुळे पावसाचा व्यत्यय येणार नाही तसेच खेळाडूंना खेळण्यासाठी भरपूर मोकळी हवा व वारा मिळेल याची काळजी घेतली आहे. अशीच काळजी प्रत्येक संघटकाने घेतली, तर सामन्यांमध्ये कोणताही व्यत्यय येणार नाही.

■ **खो-खो खेळाचा प्रसार होण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत?**

- शालेय स्तरावर हा खेळ अधिकाधिक कसा लोकप्रिय होईल, तसेच या खेळाचा पाया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोल खो-खो व लंगडी या खेळांचा खेडोपाडी प्रचार करण्याची आवश्यकता आहे. पुण्यात आम्ही दरवर्षी लंगडी व गोल खो-खो या खेळांच्या आंतरशालेय स्पर्धांसाठी भरपूर रोख पारितोषिकांची स्पर्धा आयोजित करीत असतो. असेच प्रयत्न अन्य शहरांमध्ये व तालुका स्तरावर होण्याची गरज आहे. तरच खो-खो या खेळाची लोकप्रियता वाढू शकेल.